**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**


# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ३४/२०१९** **दिनांक २६/०४/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २०/०४/२०१९ ते २६/०४/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २७/०४/२०१९ सकाळी ८:३० पासून ०१/०५/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०/०४ | २१/०४ | २२/०४ | २३/०४ | २४/०४ | २५/०४ | २६/०४ | | २७/०४ | २८/०४ | २९/०४ | ३०/०४ | ०१/०५ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३३ | ३३ | ३४ | ३५ | ३७ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २६ | २७ | २६ | २५ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ४ | ५ | २ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ५० | ६० | ७० | ७७ | ८२ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २३ | २१ | २९ | ३८ | ३८ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ४ | ७ | ६ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | वा.उ. | वा.उ. | उ. | नै.द. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३५५८.३ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २७ एप्रिल ते १ मे, २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. दिनांक २७ एप्रिल ते १ मे, २०१९ पर्यंत आकाश ढगाळ राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा दर्शविण्यात आला आहे तसेच प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये कमी ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | दाणे भरणे | • तापमानात वाढ संभवत असल्याने तसेच उन्हाळी भात पिक दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने शेतात पाण्याची पातळी ५ सें. मी. पर्यंत ठेवावी. |
| आंबा | फलधारणा अवस्था (अंडाकृती ते पक्वता अवस्था) | • तापमानात होणाऱ्या वाढीमुळे काढणी योग्य फळांची काढणी 'नूतन' झेल्याच्या सहाय्याने चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर त्वरीत करावी. यामुळे फळामधील साक्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. आंब्याची फळे काढल्यानंतर सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• आंब्यावरील काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२० सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोरोगेटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• पुढील पाचही दिवस ढगाळ वातावरण व आर्द्रतेत वाढ संभवत असल्याने आंबा फळांवर करपा रोगाचा व फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझीम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के १० ग्रॅम. प्रति १० लिटर पाण्यातून प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फळांचे फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत. फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावी व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा.<br>• आंबा झाडांचे वाढत्या उन्हापासून संरक्षण करण्यासाठी झाडाच्या बुंध्याला बोर्डो पेस्ट लावावी. |
| काजू | - | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा.<br>• काजू झाडांचे वाढत्या उन्हापासून संरक्षण करण्यासाठी झाडाच्या बुंध्याला बोर्डो पेस्ट लावावी. |
| नारळ | - | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार दयावा तसेच कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून पहिली दोन वर्षे रोपांना वरून सावली करावी. |
| सुपारी | - | • दक्षिण दिशेकडील उन्हापासून सुपारीच्या खोडाचे संरक्षण करण्यासाठी खोडावर गवत पेंढा किंवा सुपारीची झावळी बांधावी.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, सुपारी बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | - | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने फळबाग रोपवाटिकेतील गवत काढून स्वच्छता ठेवावी व गरजेनुसार रोपांसाठी सावली करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे/कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या / शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल.<br>• जनावरांना उन्हाच्या वेळेत चरावयास सोडू नये तसेच जनावरांना सावलीत बांधावे.<br>• कुकुटपालन शेडमध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खादय सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**